महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक ७८९/८६७८/एकोणतीस दिनांक:२ डिसेंबर, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- प्रशासकीय अधिकारी,नियोजन अधिकारी, अर्थसंकल्प अधिकारी व वसुली अधिकारी, गट-ब (प्रशासकीय) (राजपत्रित) पदाच्या मुलाखतीबाबत**

**संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०३/२०१८**

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकीर्ण १११८/प्र.क्र.३९/१६ अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार विषयांकित पदाच्या चाळणी परीक्षेच्या सुधारित निकालानुसार पात्र ठरलेल्या ३ उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी आयोगाच्या उपरोक्त पत्त्यावरील मुख्य कार्यालयात आयोजित केल्या असून मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमध्ये मुलाखतपत्र पाठविण्यात येत आहेत. तसेच त्यांना एस.एम.एस.द्वारे देखील कळविण्यात येत आहे. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| अ.क्र | जाहिरात क्रमांक | पदाचे नाव | मुलाखत दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | ०३/२०१८ | प्रशासकीय अधिकारी,नियोजन अधिकारी, अर्थसंकल्प अधिकारी व वसुली अधिकारी, गट –ब (प्रशासकीय) (राजपत्रित)<br>Administrative Officer, Planning Officer, Budget Officer and Recovery Officer, Group B (Administrative) (Gazetted) | दिनांक १३ डिसेंबर, २०२१ सकाळी ९.३० वा. |

२. विषयांकित पदाच्या सुधारित निकालानुसार मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी प्रमाणपत्रे/कागदपत्रे तपासणीवेळी अर्जात केलेल्या दाव्या पृष्ठयर्थ आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. ती सादर न केल्यास मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, या बाबींची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. करोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरणाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सर्व सूचना व आदेश यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

ठिकाण : मुंबई

उप सचिव (सरळसेवा - निकाल)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग